कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज,
नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राचा प्रभाग
रचना कार्यक्रम-२०१९

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक प्राथम्य

क्रमांक रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.८/का.०६,
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०९/०८/२०१९.

प्रति,
जिल्हाधिकारी,
कोल्हापूर.

विषय :- गडहिंग्लज, नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राचा प्रभाग रचना कार्यक्रम-२०१९

संदर्भः- १) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.७ (२)/का-६, दि.२४/०७/२०१५ चे आदेश.
२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१५/प्र.क्र.७/का-६, दि.०७/०५/२०१६ चे आदेश.
३) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का-६, दि.१५/०६/२०१६ चे आदेश.

महोदय,

कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज, नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची निवडणूक घेण्यासाठी महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ९(२) मधील तरतुदींनुसार त्यांची सदस्य संख्या विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांनी शासन राजपत्रात दि.३०/०७/२०१९ रोजी प्रसिध्द केली आहे.

२. आता या पत्राद्वारे गडहिंग्लज, नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुकीकरिता प्रभाग रचना, कार्यक्रम परिशिष्ट-१ नुसार देण्यात येत आहे.

३. प्रभाग रचना अंतिम करण्याबाबतचे यापूर्वीचे संबंधित आदेश अधिक्रमित करुन राज्य निवडणूक आयुक्त यांनी त्यांचे अधिकार रानिआ आदेश क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.०७/का.६, दिनांक ०७/०५/२०१६ अन्वये संबंधित मुख्याधिकारी, जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्त यांना प्रदान केले आहेत.

४. **प्रभाग रचनेचे तीन मुख्य टप्पे राहणार आहेत:-**

(अ) आरक्षणासह प्रारुप प्रभाग रचना करणे,

(ब) हरकती व सूचनांवरील सुनावणी घेणे, व

(क) अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करणे.

५. **प्रभाग रचना करताना प्रामुख्याने खालील बाबींवर लक्ष देणे आवश्यक आहे. :-**

(i) या निवडणुकांकरिता जनगणना कार्यालयाची सन २०११ च्या जनगणनेची आकडेवारी वापरण्यात यावी. **सोबतच्या परिशिष्ट-२ मधील नमुन्यानुसार नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांचेकडून प्रमाणपत्र घेण्यात यावे.**

(ii) प्रभाग रचना करताना गुगल मॅप वापरुन, त्यावर प्रगणक गट दर्शविण्यात यावेत.

(iii) मुख्याधिकारी यांनी प्रारूप प्रभाग रचनेचा प्रस्ताव तयार करावा.

(iv) गडहिंग्लज नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्रासाठी देय जागांकरिता आरक्षण सोडत काढण्याची आवश्यकता नाही.

(v) प्रभागरचना आणि आरक्षण आयोगाचे आदेश क्र.रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.१०/का.६, दि.१५/६/२०१६ नुसार करावी. या आदेशात विहित केलेल्या **परिशिष्ट- १ ते ८** नुसारची माहिती तयार करुन ती सर्व जनतेच्या निदर्शनास आणण्याकरिता आवश्यक ती उपाययोजना करावी.

(vi) प्रारुप प्रभाग रचना व प्रभागदर्शक नकाशे, मतदारांच्या माहितीसाठी हरकती व सूचना, अंतिम प्रभाग रचना इ. याकरिता मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देण्यात यावी. उदा.

(a) स्थानिक वृत्तपत्रे, केबल टी.व्हि. वर

(b) नगर परिषदेच्या प्रभाग समितीचे व इतर कार्यालयातील सूचना फलक,

(c) जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयाचे सूचना फलक

(d) स्थानिक पातळीवर इतर माध्यमे.

(e) जिल्हाधिकारी व नगर परिषदेच्या संकेत स्थळावर इ.

(vii) प्रारूप प्रभाग रचना व अंतीम प्रभाग रचना जिल्हाधिकारी व नगर परिषदेच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बंधनकारक राहील.

मा. राज्य निवडणूक आयुक्तांच्या आदेशानुसार,

आपला,

( किरण कुरुंदकर )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

प्रत:-

१. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
२. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे
३. मुख्याधिकारी, गडहिंग्लज नगर परिषद, गडहिंग्लज जिल्हा-कोल्हापूर.

# परिशिष्ट-१

(राज्य निवडणूक आयोगाचे अर्ध शासकीय पत्र क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.०८/का-०६, दिनांक ०९/०८/२०१९ सोबतचे परिशिष्ट.)

(गडहिंग्लज, नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची प्रभाग रचना व हरकतींचा कार्यक्रम-२०१९)

| अ.क्र. | टप्पा | कार्यवाही कोणी करावयाची आहे. | टप्पा सुरु करण्याचा दिनांक/संपविण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | हद्दवाढ क्षेत्राच्या प्रभागाचे क्षेत्र, सीमांकन यांसह नकाशा व लोकसंख्या आणि आरक्षण याबाबत सविस्तर प्रारुप प्रभाग रचनेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करणे. | मुख्याधिकारी | १९/०८/२०१९ (सोमवार) पर्यंत |
| २. | नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राच्या प्रारुप प्रभाग रचनेच्या प्रस्तावास मान्यता देणे. | जिल्हाधिकारी | २०/०८/२०१९ (मंगळवार) पर्यंत |
| ३. | नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राच्या प्रभागाचे प्रारुप, प्रभागदर्शक नकाशा व सदस्य पदाच्या आरक्षणाची अधिसूचना कलम १० नुसार मतदारांच्या माहितीसाठी व हरकती व सूचना मागविणेकरिता वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर प्रसिध्द करणे. | मुख्याधिकारी | २१/०८/२०१९ (बुधवार) |
| ४. | हरकती व सूचना मागविण्याचा कालावधी | | २१/०८/२०१९ (बुधवार) ते २७/०८/२०१९ (मंगळवार) पर्यंत |
| ५. | प्राप्त हरकती व सूचनांवर सुनावणी देणे. | जिल्हाधिकारी | २९/०८/२०१९ (गुरुवार) पर्यंत |
| ६. | हरकती व सूचनांच्या अनुषंगाने अभिप्राय देऊन संबंधीत विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, यांचेकडे अहवाल पाठविणे. | जिल्हाधिकारी | ३०/०८/२०१९ (शुक्रवार) पर्यंत |
| ७. | अंतिम प्रभाग रचनेस मान्यता देणे. | विभागीय आयुक्त | ३१/०८/२०१९ (शनिवार) |
| ८. | अधिनियमातील कलम १० नुसार अंतिम अधिसूचना वृत्तपत्रात व स्थानिक पातळीवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व नगर परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणे. | जिल्हाधिकारी | ०३/०९/२०१९ (मंगळवार) पर्यंत |

**टीपः- गडहिंग्लज, नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राच्या प्रभाग रचना इ. ते अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यापर्यंतच्या कामावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हाधिकारी यांनी उप जिल्हाधिकारीपेक्षा कमी नसलेल्या दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करावी.**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र.

# परिशिष्ट -२

## प्रमाणपत्र - प्रारुप प्रभाग रचना

जिल्हयाचे नाव - कोल्हापूर

नगरपरिषदेचे नाव - गडहिंग्लज

मी..............................मुख्याधिकारी, गडहिंग्लज,नगरपरिषद, जिल्हा-कोल्हापूर असे प्रमाणित करतो की, गडहिंग्लज, नगरपरिषद २०१९ च्या हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेली प्रारुप प्रभाग रचना खालील दक्षता घेऊन करण्यात आलेली आहे.

१) सन २०११ च्या लोकसंख्येची आकडेवारी व प्रगणक गटांचे नकाशे जनगणना कार्यालयाकडून प्राप्त करुन घेतलेले आहेत. ज्या ठिकाणी जनगणना कार्यालयाकडून माहिती प्राप्त झालेली नाही. तेथे २०११ ची लोकसंख्या सर्वेक्षण करुन निश्चित करण्यात आलेली आहे. याबाबत आवश्यक ते प्रमाणपत्र संचालक, जनगणना कार्यालय यांच्याकडून घेण्यात आलेले आहे. (*)

२) प्रभाग रचना करण्याकरीता गुगल मॅप व जनगणना कार्यालयाकडील प्राप्त प्रगणक गट नकाशांचा वापर करण्यात आलेला आहे.

३) प्रभाग रचना तयार करताना अधिनियम, नियम तसेच राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश, निदेश व सूचना यांचे तंतोतंत पालन करण्यात आलेले आहे.

स्वाक्षरी

ठिकाणः----------------- (नाव ------------------------)

दिनांकः---------------- मुख्याधिकारी, गडहिंग्लज,नगरपरिषद

जिल्हा-कोल्हापूर

**(*) सदर मजकूर आवश्यक असेल तेथेच नमूद करण्यात यावा.**